Add

५५

प्रति,
सर्व जिल्हाधिकारी,

क्रमांक:पीओएस-१०९४/१८५४/स्वासैकक्ष,

सामान्य प्रशासन विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक:- २३-११-१९९४

विषय:- स्वातंत्र्य सैनिकांच्या पश्चात त्यांच्या विधवांना राज्य शासनाचे पेन्शन मंजूर करणेबाबत...

संदर्भ:- जिल्हाधिकारी, नागपूर यांचे पत्र क्र. गृह/कार्या-१५.३/कावि-६४४१/९४, दिनांक १५.२.१९९४.

जिल्हाधिकारी, नागपूर यांनी उपरोल्लेखित पत्रान्वये तहसिलदार यांना वारसदार प्रमाणपत्र देण्याचे अधिकार नसल्या कारणास्तव तहसिलदार नागपूर यांनी वारसदार प्रमाणपत्र देण्याचे बंद केल्यामुळे दिवाणी न्यायालयाकडून सक्सेशन प्रमाणपत्र दाखल करण्यासाठी सांगण्यात आल्याचे कळविले आहे. वारसदार प्रमाणपत्रासंबंधात येणा-या अडचणी विचारात घेता ही प्रमाणपत्रे स्वातंत्र्य सैनिकांच्या विधवांना होणारा त्रास व विलंब लक्षात घेऊन केंद्र शासन पेन्शन धारकांप्रमाणेच राज्य शासन पेन्शनधारकांकरता नामनिर्देशनाची सोय ठेवावी किंवा स्वातंत्र्य सैनिकांच्या विधवांच्या शपथपत्राच्या आधारे त्यांना पेन्शन सुरु करण्याची तरतूद करावी असो सूचना केली आहे.

२. यासंबंधात येणा-या अडचणीचा विचार करुन शासन आता असे आदेश देत आहे की, स्वातंत्र्य सैनिकांना जिल्हाधिकारी कार्यालयाकडून पती-पत्नीचे एकत्र छायाचित्रासह जे ओळखपत्र देण्यात येते. त्या संयुक्त छायाचित्राच्या आधारे स्वातंत्र्य सैनिकांच्या पश्चात त्यांच्या विधवांना तात्काळ पेन्शन देण्याबाबत ची कार्यवाही जिल्हाधिकारी कार्यालयाने करावी. त्यांच्याकडून वेगळ्या वारसदार प्रमाणपत्राची मागणी करण्यात येऊ नये.

३. स्वातंत्र्य सैनिकांच्या पश्चात त्यांच्या विधवाना तात्काळ आर्थिक सहाय्याची आवश्यकता असल्यामुळे शासनाने स्वातंत्र्य सैनिकांच्या वारसदारांना पेन्शन देण्याबाबत जिल्हाधिका-यांना अधिकार दिलेले आहेत. या अधिकाराचा

[कृ.मा.प.]

जिल्हाधिकाऱ्यांनी पुरेपूर उपयोग करून अशा प्रकरणामध्ये तात्काळ पेन्शन मंजूर करण्याबाबतची कार्यवाही करावी. जेणेकरून, त्यांना शासनाकडे अर्ज करण्याची आवश्यकता भासणार नाही.

अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी-

सर्व कक्ष अधिकारी, स्वातंत्र्य सैनिक कक्ष, मंत्रालय, मुंबई.

प्रत माहितीसाठी रवाना:-

१] मा. सभापती, स्वातंत्र्य सैनिक उच्चाधिकार समिती, मुंबई,

२] मा. सदस्य सचिव, स्वातंत्र्य सैनिक उच्चाधिकार समिती, मंत्रालय, मुंब